Special Issue August 2019

# विद्यावार्ता ®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/201
ISSN-2319 931

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यशास्त्र विषया अंतर्गत
राष्ट्रीय चर्चासत्र

# मानवी अधिकार :
## सद्यस्थिती आणि आव्हाने

संपादक
डॉ.तात्या बाळकिसन पुरी

26) मानव अधिकार आणि सामाजिक न्याय
विलास वि. धबाले, नागपूर ||84

27) भटक्या विमुक्त जाती व इतर मागासवर्गीयांचे मानवी अधिकारातील स्थान
डॉ. साहेब राठोड, पाथरी ||88

28) मानवाधिकार : जागतिक ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि कार्यपध्दत
डॉ. विलास घोडे, नागपूर ||91

29) महिला आणि मानवी अधिकार
प्रा. डॉ. शामल भिवराज जाधव, बीड ||97

30) मानवी आधिकार आणि महिला सुरक्षा : संवैधानिक तरतूदींचा राजकिय अभ्यास
डॉ. कदम हारिभाउ पांडुरंगराव, बिड ||99

31) दहशतवाद नक्षलवाद आणि मानवी अधिकार
थोरात विकास आबासाहेब, औरंगाबाद ||102

32) स्त्री—पुरुष असमानता आणि मानवाधिकार
महेश कांबळे, औरंगाबाद, डॉ. सुहास मोराळे, बीड ||104

33) महिला आणि मानवी अधिकार
प्रा. ठोंबरे महेश अशोक, माजलगांव, डॉ. एच.एस. भूमकर, बीड ||107

34) आरोग्याचा अधिकार — एक मानवाधिकार
प्रा. डॉ. रामकिशन वसंतराव लोमटे, फुलंब्री ||109

35) मानवाधिकार आणि शिक्षण
डॉ. शिवराज रामराव पाटील, लातूर. ||112

36) मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना
सुर्यवंशी जी.डी., कोल्हापूर. ||115

37) भारतीय संविधानातील मानवी हक्क आणि महिला
फड अजय श्रीधर, लातुर ||118

38) मानव अधिकार व वर्तमान स्थिती
डॉ. राम फुन्ने, परभणी ||120

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

विद्यापीठे संस्था यांनी मानवाधिकारास पूरक उपक्रम राबवावेत.

५. सर्व स्तरातील प्रसारमाध्यमांनी मानवाधिकाराचा प्रचार, प्रसार करून मानवाधिकार विरूध्द कृतीस उघडे पाडावे. मानवाधिकाराबाबत राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर जनजागृती करावी. शिक्षणाचा मूळ उद्देश मानव कल्याण असून त्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक व सर्वांचे आद्य कर्तव्य आहे याचे भान प्रत्येकांनी आपापल्या ठिकाणी ठेवणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. ज. रा. शिंदे, डॉ. प्रशांत अमृतकर, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
२. प्रा. डॉ. बी. डी. तोडकर, भारत आणि जग, डायमंड पब्लिकेशन, पुणे २०१०.
३. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.
४. विकास देशपांडे, मानवी हक्क, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, २००३.

❑❑❑

36

# मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना

**सुर्यवंशी जी.डी.**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

***********

**प्रस्तावना :**

मानवी संस्कृतीच्या वेगवेगळया टप्प्यांवर मानवास जगण्याकरिता आवश्यक असणाऱ्या हक्कांसाठी निरनिराळया संज्ञा वापरल्या आहेत. जसे की नैसर्गिक हक्क, प्राथमिक हक्क, मुलभूत हक्क राईटस ऑफ मॅन, मानवी हक्क, घटनात्मक हक्क या त्याकाळी संज्ञा आहेत. मानवी हक्क ही संकल्पना जरी नवीन वाटत असली तरी याची पायमुळे नैसर्गिक हक्क या प्राचिन तत्वात आढळतात. मानवी हक्क ही संज्ञा अचानक निर्माण झालेली नसुन ती अनेक वर्षात विकसित झालेली आहे. मानवी हक्क म्हणजे अनेक पिढयांचे योगदान, दुर्दम्य इच्छा व अनुभव यांचा परिपाक होय.

मानवांना नैसर्गिक हक्क असतात. त्याचे हक्क स्वत:कडून संबंधित राष्ट्राकडुन संरक्षित केले गेले पाहिजेत. मानवी हक्क म्हणजे असे हक्क जे सर्व माणसांना असतात जे त्यांच्यापासुन वेगळे करता येत नाही. संयुक्त राष्ट्रसंघाने १० डिसेंबर १९४८ साली मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा प्रस्तृत केला आणि मानवतेच्या विविध प्रश्नांवर करारनामे केले. या करारनाम्यांना सभासद राष्ट्रांनी मंजुरी देऊन या करारनाम्यांशी प्रतिबद्ध व्हावे यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ प्रयत्नशील आहे. राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतर मानवी हक्कांना औपचारिक व वैश्विक स्वरूप प्राप्त झाले. मानवी हक्क म्हणजे, असे सर्व हक्क जे प्रत्येकास निसर्गत च मिळालेले असतात. प्रा. लास्की यांच्या मतानुसार ''मानवी हक्क म्हणजे, ''हक्क म्हणजे सामाजिक